ePaper

# संतोष देशमुखांच्या लेकीची आर्त हाक, मुंबईत निघणार जनआक्रोश मोर्चा!



| वर्ष - 8 | अंक -196

| UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 25 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- श्रेयस अय्यर आणि अंपायरमध्ये जुंपली!
- शाहांबरोबर राजकीय चर्चा झाली ?
- 600 कोटी रुपये वसुलीचे आव्हान!
- गुन्हे करा अन् बाहेर फिरा!


## बनावट आधारकार्ड वर मिळविला पासपोर्ट!

# चिंचवडमध्ये 2 बांगलादेशी जेरबंद!

## हिंजवडीत बांधकाम साईटवर नऊ महिने केले काम

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

**चिंचवड औद्योगिक परिसरातील भोला हॉटेलमागे सुरू असलेल्या एका बांधकाम साईटवर काम करीत शहरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या दोन बांगलादेशी घुसखोरांना पिंपरी - चिंचवड दहशतवाद विरोधी शाखेच्या पथकाने जेरबंद केले. ही कारवाई शुक्रवारी (दि. २३) दुपारी करण्यात आली. त्यांच्याकडे बनावट आधारकार्ड, जन्म दाखला व शाळा सोडल्याचा दाखला मिळून आला आहे. एकाने हिंजवडी आयटी पार्कमध्ये बांधकामावर नऊ महिने काम केल्याचे समोर आले आहे. तर, एकाने पाणीपतमधून पासपोर्टही काढला आहे.**




शोहग सुकुमार मजुमदार (वय २०) व सुमन गोपाळ टिकादार (३५) अशी अटक केलेल्या बांगलादेशी घुसखोरांची नावे आहेत. पोलिस अमलदार मोहसीन शेख यांनी पिंपरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चिंचवड येथे भोला हॉटेलमागे सुरू असलेल्या एका बांधकाम साईटवर काही बांगलादेशी घुसखोर ओळख लपवून वास्तव्य करत असल्याची माहिती पिंपरी - चिंचवड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी शाखेला मिळाली. त्यानुसार, दहशतवाद विरोधी शाखेचे पथक आणि पिंपरी पोलिसांनी कारवाई करत शोहग आणि सुमन या दोन्ही बांगलादेशींना जेरबंद केले. त्यांनी बनावट कागदपत्राच्या आधारे तसेच भारतात राहण्यासाठी लागणाऱ्या वैध व्हिसाशिवाय हिंदुस्थान - बांगलादेश सीमेवरील मुलकी अधिकाऱ्यांच्या लेखी परवानगीशिवाय घुसखोरीच्या मार्गाने भारतात घुसखोरी केल्याचे स्पष्ट झाले आहे. महिला फौजदार साळूंखे तपास करीत आहेत.

### चार-पाच वर्षापासून भारतात

चार ते पाच वर्षापूर्वी शोहग मजुमदार याला आई-वडीलांसह एंजटने दोन दुचाकींवरून भारतात आणले. पश्चिम बंगाल येथील परगणा जिल्ह्यात एका नातेवाईकाकडे दीड-दोन महिने राहिल्यानंतर त्याचे आई-वडील पुन्हा बांगलादेशात निघून गेले. त्यांनी भारत - बांगलादेशची सीमा नेमकी कोठून पार केली, याबाबत माहिती मिळू शकलेली नाही. शोहग याने सुमारे एक




वर्षे परगणा येथील चपल विक्रीच्या दुकानात काम केले. त्यानंतर एका मित्राने पुण्यात काम आहे, असे त्याला सांगितले. त्यामुळे शोहग याने ३ फेब्रुवारी २०२४ रोजी पश्चिम बंगाल येथून बनावट आधारकार्ड तयार केले. आधारकार्ड आल्यानंतर सुमन नावाच्या मित्राबरोबर रेल्वेने फेब्रुवारी २०२४ मध्ये तो पुण्यात आला. त्याने हिंजवडी आयटी पार्कमध्ये नऊ महिने बांधकाम साईटवर काम केले. त्यानंतर तो पुन्हा एक महिना पश्चिम बंगालमध्ये जावून राहिला. २ डिसेंबर रोजी पुरोशन नावाच्या व्यक्तीसोबत तो पुन्हा रेल्वेने पिंपरी येथे आला. त्याने पिंपरीत पॅनकार्ड किंवा कोणतेही बँक खाते काढलेले नाही. बांगलादेशातील कुटूंबियांशी त्याचे मोबाईलवरून मोठ्या प्रमाणात बोलणे झाल्याचे दिसून आले आहे.

> "दोघे बांगलादेशी भारतात नेमके कोणत्या मार्गाने आले, त्यांच्यासोबत आणखी कोणी शहरात वास्तव्यास आहेत का, याबाबत सखोल तपास केला जात आहे."
>
> **- विकास राऊत,**
> (पोलीस निरीक्षक - दहशतवाद विरोधी शाखा - पिंपरी - चिंचवड



### मोबाईलमध्ये 59 बांगलादेशी नंबर

सुमन टिकादार हा हरियाणातील पाणीपत येथे राहत असून त्याच पत्त्यावरून त्याने बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड आणि पासपोर्ट काढल्याचे समोर आले आहे. आई-वडीलांसह तो भारतात राहत होता. कामाच्या शोधात तो पुण्यात आला होता. तेथून पिंपरी - चिंचवड परिसरात मजुरीसाठी डिसेंबर २०२४ मध्ये आला आहे. त्याच्याकडे रेडमी कंपनीचा मोबाईल फोन मिळून आला आहे. त्या मोबाईलमध्ये ५९ बांगलादेशी मोबाईल नंबर असून त्या क्रमांकावर तो मोठ्या प्रमाणात व्हॉटसॲपद्वारे संपर्कात असल्याचे निदर्शनास आले आहे.

# गुन्हे करा अन् बाहेर फिरा!

## पुण्यात शिक्षा होण्याचे प्रमाण नगण्य, सेशन कोर्टात 13 टक्केच दोषसिद्धी

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यात गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण नगण्य असल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. गेल्या वर्षी (२०२४) प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात केवळ १८ टक्के खटल्यांत गुन्हेगारांना शिक्षा झाली असून, जिल्हा सत्र न्यायालयांतील खटल्यात हेच प्रमाण १३ टक्के आहे. त्यामुळे गुन्हेगार पोलिसांच्या हाती लागले, तरीही न्यायालयीन प्रक्रियेत पोलिस अपयशी ठरत असल्याचे दिसून आले आहे.**



माहिती तंत्रज्ञान आणि वाहतूक क्षेत्राच्या विस्तारानंतर पुण्यातील नागरीकरण वाढले. अफाट वेगाने होणारे शहरीकरण आणि लोकसंख्येबरोबरच गुन्हेगारीही वाढली. गुन्हेगारी वाढत असताना कायद्याचे हात मात्र, बळकट झाले नाहीत. दाखल गुन्ह्यात पोलिसांनी आरोपींची धरपकड केली, तरी त्यांच्यावरील आरोप सिद्ध करण्यात आणि त्यांना शिक्षा ठोठावण्यात अपयश आल्याचे चित्र आहे.

गेल्या तीन वर्षांतील जिल्हा सत्र न्यायालय आणि प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांसमोरील खटल्यांचा आढावा घेतला असता, सन २०२२ मध्ये अनुक्रमे १५ टक्के आणि १० टक्के खटल्यांत आरोपींना शिक्षा झाली. हे प्रमाण सन २०२३ मध्ये अनुक्रमे १७ टक्के आणि चार टक्के होते. सन २०२४ मध्ये प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयातील खटल्यात शिक्षा होण्याचे प्रमाण चार टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत वाढले. मात्र, सत्र न्यायालयात शिक्षा होण्याचे प्रमाण १७ टक्क्यांवरून १३ टक्क्यांपर्यंत खाली घसरले, असे पुणे पोलिसांच्या आकडेवारीवरून दिसून येते.

### निम्मे गुन्हे न्यायालयीन कक्षेतच

शहरातील पोलिस ठाण्यांतील दाखल गुन्ह्यांची संख्या आणि निकाली खटल्यांची संख्या यातही मोठी तफावत आहे. पुणे पोलिस आयुक्तालयांतर्गत २०२२, २०२३ आणि २०२४ या वर्षांत अनुक्रमे १०, ६९२, ११,९७४ आणि १२,९५४ गुन्हे दाखल झाले. त्या तुलनेत या तिन्ही वर्षांत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आणि सत्र न्यायालयांत अनुक्रमे ६२०४, ७०६९ आणि १७३९ गुन्हे निकाली निघाले. म्हणजेच, जवळपास निम्मे गुन्हे अद्याप न्यायालयीन प्रक्रियेत आहेत किंवा पोलिसांकडून छडा लागलेला नाही.

### गंभीर गुन्हे घटले

पुणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील पोलिस ठाण्यांत गेल्या वर्षी (२०२४) दाखल झालेल्या एकूण गुन्ह्यांची संख्या २०२३च्या तुलनेत वाढली आहे. 'गंभीर गुन्ह्यांत घट झाली असून, फसवणूक, तसेच सायबर गुन्ह्यांची संख्या वाढली आहे. २०२३मध्ये ११,९७४ गुन्हे दाखल झाले. २०२४मध्ये १२,९५४ गुन्हे दाखल झाले. त्यात फसवणुकीच्या २०२१ गुन्ह्यांचा समावेश आहेत,' अशी माहिती पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिली.

### न्यायालयाची पायरी चढले नाहीत का?

पुण्यात सन २०२२ मध्ये १०,९६२ गुन्हे दाखल झाले होते. त्या वर्षात ६२०४ गुन्ह्यांत न्यायालयात आरोपपत्र दाखल करून खटले निकाली काढण्यात आले. त्यानंतर सन २०२३ मध्ये दाखल ११,९७४ गुन्ह्यांपैकी ५६५० गुन्ह्यांत खटले निकाली निघाले. गेल्या वर्षी (२०२४) एकूण १२.९५४ गुन्हे दाखल झाले. पैकी केवळ १,७३९ गुन्हे निकाली निघाले. एकीकडे पुण्यात दोषसिद्धीचे प्रमाण नगण्य असताना २०२४ मध्ये गुन्हे निकाली निघण्याच्या प्रमाणातही घट झाली. त्यामुळे २०२४ मध्ये पोलिस न्यायालयाची पायरी चढले नाहीत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### 'क्राइम इन महाराष्ट्र 2022 'नुसार एकूण खटल्यांतील दोषसिद्धी

५६.४८ -टक्के बृहन्मुंबई पोलिस आयुक्तालय
३९.४२ -टक्के पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालय
२५.८५ -टक्के पुणे पोलिस अधीक्षक कार्यालय
१६.०२ -टक्के पुणे पोलिस आयुक्तालय

(रायगड, अमरावती, पालघर, वर्धा, चंद्रपूर, अकोला, नागपूर, यवतमाळ येथील ग्रामीण पोलिसांच्या हद्दीतील खटल्यात शिक्षा होण्याचे प्रमाण ६० ते ८० टक्क्यांच्या दरम्यान आहे.)


> पुणे पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत दाखल गुन्ह्यांमध्ये न्यायालयात शिक्षा होण्याचे प्रमाण गेल्या वर्षाच्या तुलनेत वाढले आहे. 'जेएमएफसी मध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण चार टक्क्यांवरून अठरा टक्क्यांपर्यंत वाढले आहे. आगामी काळात 'जेएमएफसी' आणि सत्र न्यायालयात शिक्षेचे प्रमाण वाढावे, यासाठी पोलिसांकडून अधिक प्रभावी कामगिरी करण्यात येईल.
> **–अमितेशकुमार,** पोलिस आयुक्त, पुणे शहर

# राज्यघटनेची काटेकोर अंमलबजावणी करावी

## डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन होणार

। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यघटनेची काटेकोर अंमलबजावणी करावी या मागणीसाठी प्रजासत्ताक दिनाच्या अमृतमहोत्सव पूर्तीदिनी रविवारी (२६ जानेवारी) ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन होणार आहे. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय" असे ब्रिटिशांना सुनावणाऱ्या लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यासमोर सकाळी साडेदहा वाजता राष्ट्रीय एकात्मता समितीचे कार्यकर्ते 'भारतीय संविधान' या ग्रंथासह धरण्यामध्ये सहभागी होणार आहेत.**



भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी २६ जानेवारी १९५० पासून सुरू झाली. त्याची आठवण ठेवण्यासाठी दरवर्षी २६ जानेवारी हा दिवस आपण प्रजासत्ताक दिन म्हणून आनंदाने साजरा करतो. यंदाच्या २६ जानेवारीला त्याला ७५ वर्षे पूर्ण होतील. मात्र, सध्या प्रजासत्ताक हे संबोधनापुरते राहिले आहे, अशी खंत व्यक्त करीत डॉ. बाबा आढाव यांनी धरणे आंदोलनामागची भूमिका स्पष्ट केली. प्रजासत्ताकाचा गाभा असणाऱ्या कायदे मंडळाच्या निवडणुकांमध्ये अधिकृत, अनधिकृत पैशांचा प्रचंड वापर नुकताच झाला. निवडणुकीसाठी वापरली जाणारी ईव्हीएम मशीनची पद्धतही संशयाच्या भोवऱ्यात अडकली आहे. निवडून आल्यानंतर सत्ताधारी पक्ष आणि त्या पक्षाचे केंद्रातील सरकार यांनी घटनात्मक संस्था मोडीत काढण्याचा चंग बांधला आहे. भल्याबुऱ्या सर्व मार्गाने विरोधकांची सरकारे पाडणे, त्यांच्या नेत्यांमागे तपास यंत्रणांचा ससेमीरा लावणे. महागाई, बेरोजगारी, शेतमालाला भाव न मिळणे, शहरांचे बकालीकरण, महिला, दलित, अल्पसंख्यांक यांच्यावर होत असणारे अत्याचार अशा प्रश्नांवरील लक्ष विचलित करण्यासाठी म्हणून धार्मिक विद्वेष पसरवणे. अशा प्रकारांमध्ये सरकारी पक्ष आणि त्याच्याशी संबंधित सर्व संघटना कार्यरत आहेत, याकडे डॉ. आढाव यांनी लक्ष वेधले आहे. देश जणू एका उद्योगपतीसाठी चालवला जात आहे. उद्योगपतींची लाखो कोटी रुपयांची कर्जे माफ केली गेली आहेत. पंतप्रधानांनी 11 वर्षात एकही पत्रकार परिषद घेतली नाही. संसदेत उपस्थित राहणे त्यांना महत्त्वाचे वाटत नाही. सत्ताधारी पक्षच संसद चालू देत नाही. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी सरकार आणि त्याच्या पक्षातील नेत्यांच्या पोटातले ओठावर आले. प्रजासत्ताकाच्या ७५ वर्षांचा फक्त उत्सव साजरा करण्यापेक्षा प्रजासत्ताकाची आणि त्याचा आधार असणाऱ्या राज्यघटनेतील समता, स्वातंत्र्य, बंधुभाव, धर्मनिरपेक्षता, समाजवाद या मूल्यांची काटेकोर अंमलबजावणी व्हावी, याकडे लक्ष वेधण्याची कृती करणे ही काळाची गरज आहे, असे आढाव यांनी स्पष्ट केले.

> 'सरकारचे डोके ठिकाणावर ठिकाणावर आहे काय?' आणि 'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे' अशा जळजळीत शब्दांत ब्रिटिश सरकारची संभावना करणारे लोकमान्य टिळक यांच्या पुतळ्यासमोर सरकारने डोके ठिकाणावर ठेवून भारतीय संविधानाची काटेकोर अंमलबजावणी करावी या मागणीसाठी रविवारी प्रजासत्ताक दिनी राष्ट्रीय एकात्मता समितीच्या वतीने जनतेचे धरणे आंदोलन होत आहे. या धरण्यात सहभागी होण्यासाठी येताना आपल्याकडील उपलब्ध भारतीय राज्यघटनेची प्रत सोबत घेऊन यावे.
> **-डॉ. बाबा आढाव,** ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते

# PCMC: दोन महिन्यांत तब्बल 600 कोटी रुपये वसुलीचे आव्हान!

## कर संकलन विभाग; हॉटेल, रूग्णालय, शाळांकडे कोट्यवधींची थकबाकी

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी- चिंचवड :निवासी मालमत्ता, शाळा यांच्यानंतर कर संकलन विभागाने शहरातील प्रसिद्ध असलेले हॉटेल, रूग्णालय आणि शैक्षणिक संस्थांकडील थकबाकी वसूलण्यासाठी मोर्चा वळवला आहे. अनेक संस्थांकडे गेल्या अनेक वर्षांपासून 5 कोटी 4 लाख रूपयांची मालमत्ताकराची थकबाकी आहे. त्या मालमत्तांना महापालिकेच्या कर संकलन विभागाने जप्तीपूर्व नोटीसा बजावल्या आहेत. आता त्या मालमत्ता सील करून जप्त करण्याची कारवाई सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे या मालमत्ता धारकांचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान येत्या दोन महिन्यात कर संकलन विभागास तब्बल 600 कोटी रूपयांची वसुली करण्याचे आव्हान असणार आहे.**







दि.1 एप्रिल 2024 ते 22 जानेवारी 2025 या कालावधीत 18 विभागीय कार्यालयाकडून 642 कोटी 18 लाखांची वसुली करण्यात आली आहे. या कार्यालयांना 31 मार्च 2025 पर्यंत एकूण 1 हजार 250 कोटी रूपयांचे टार्गेट देण्यात आले आहे. आता पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाने एक लाखापेक्षा अधिक थकबाकी असलेल्या बिगरनिवासी व निवासी मालमत्ता सील करून जप्त करण्याची कारवाई सुरू केली आहे. येत्या दोन महिन्यात कर संकलन विभागास तब्बल 600 कोटी रूपयांची वसुली करण्याचे आव्हान असणार आहे.

> नोटीसा बजावूनही प्रतिसाद न देणाऱ्या मालमत्ता जप्त करण्यात येत आहेत. संपूर्ण थकबाकी भरल्याशिवाय सील काढत नाही . एक लाखापेक्षा अधिक थकबाकी असलेल्या बिगरनिवासी मालमत्ता सील करून जप्त करण्याची कारवाई अधिक तीव्र करण्यात आली आहे. मुदतीमध्ये थकबाकी न भरल्यास त्या मालमत्तांचा लिलाव करण्यात येत आहे.
>
> **– अविनाश शिंदे,**
> सहायक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग.

### 21 शाळांकडे कोट्यावधींची थकबाकी...

शहरातील 21 नामांकित शाळांकडे 1 कोटी 87 लाख रूपयांची थकबाकी असून यापैकी नऊ शाळा सील केल्या आहेत. शाळांना सील करताच थकबाकी भरल्यामुळे तीन शाळांचे सील काढण्यात आले आहे. 13 लहान-मोठ्या रूग्णालयांकडे 1 कोटी 37 लाख रूपयांची थकबाकी आहे. रूग्णालय चालकांना महापालिकेने जप्तीपूर्व नोटिसा बजाविल्या आहेत.

### 35 हॉटेल चालक रडारवर...

शहरातील विविध भागात राजकीय पुढा-यांसह उद्योजकांचे हॉटेल, बार आहेत. त्यामुळे हे हॉटेल चालक गेल्या अनेक वर्षांपासून करच भरत नसल्याचे समोर आले आहे. शहराच्या विविध भागातील तब्बल 35 हॉटेल चालकांकडे 1 कोटी 80 लाख रूपये कराची थकबाकी आहे.

थकबाकी असलेल्यांमध्ये बड्या हॉटेल व्यावसायिकांची हॉटेल आहेत. या व्यावसायिकांना नोटिसा देण्यात आल्या असून कर न भरल्यास हॉटेल सील करण्याचा आक्रमक पवित्रा महापालिकेने घेतला आहे.

---

# पिंपरी-चिंचवडचे नाव आता शिक्षण क्षेत्रातही अग्रेसर

## आमदार शंकर जगताप: व्हीनस आर्ट फाउंडेशनचा डिझाईन एज्युकेशन फेअर उपक्रम

। पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**कामगार नगरी म्हणून ओळख असलेल्या पिंपरी चिंचवड शहराचे नाव आता शिक्षण क्षेत्रात देखील पुढे येत आहे. यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठ व डी. वाय. पाटील विद्यापीठ यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. तसेच मागील पंधरा वर्षांपासून डिझाईन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्हीनस आर्ट फाउंडेशनचा देखील गौरवाणे उल्लेख करावा लागेल असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी केले.**



व्हिनस आर्ट फाउंडेशनच्या वतीने आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ, दिशा सोशल फाउंडेशन यांच्या सहयोगाने “पीसीएमसी डिझाईन एज्युकेशन फेअर २०२५” चे उद्घाटन चिंचवड ऑटो क्लस्टर येथे आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले. यावेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, माजी विरोधी पक्ष नेते नाना काटे, शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती नाना शिवले, माजी नगरसेवक मोरेश्वर भोंडवे, व्हिनस आर्ट फाउंडेशनच्या चेअरमन अपूर्वा पाटील, अमर पाटील, संतोष निंबाळकर विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

रविवारपर्यंत सुरू असणाऱ्या या फेअर मध्ये पिंपरी चिंचवड आणि पुणे शहरातील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना व पालकांसह सर्वांना विनामूल्य प्रवेश आहे. डिझाईन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी देशभरातील डिझाईन कोर्स उपलब्ध असणाऱ्या विद्यापीठांची माहिती दालने उभारण्यात आली आहेत.

त्यामध्ये पीसीईटी डिझाईन स्कूल अँड पीसीयू आर्किटेक्चर कॉलेज, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी आकुर्डी, एमआयटी स्कूल ऑफ डिझाईन आळंदी, विश्वकर्मा युनिव्हर्सिटी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन (एनआयटी) अहमदाबाद गुजरात, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी (एनआयएफटी) न्यू मुंबई खारघर, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्राफ्ट अँड डिझाईन (आयआयसीडी) अँड आयआयटी बॉम्बे, चित्रकूल एनआयडी क्लासेस चिंचवड, इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन निरमा युनिवर्सिटी अहमदाबाद गुजरात, महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट डिझाईन टेक्नॉलॉजी (एमआयटीएडीटी) लोणी काळभोर, महिंद्रा युनिव्हर्सिटी हैदराबाद, ऐरेना ॲनिमेशन पुणे आदींचा समावेश आहे.

### डिझाईन क्षेत्राची व्याप्ती मोठी : डॉ. गिरीश देसाई

प्रमुख पाहुणे डॉ. गिरीश देसाई यांनी सांगितले की, डिझाईन क्षेत्राची व्याप्ती मोठी आहे. या क्षेत्रात देखील उत्कृष्ट करिअर करता येते. आज प्रत्येक क्षेत्रात डिझाईन अत्यावश्यक आहे. वस्तू विक्रीसाठी सादरीकरण खूप महत्त्वाचे आहे. हे सादरीकरण (दृश्य कलेच्या) डिझाईनच्या माध्यमातून उत्कृष्टपणे करता येते. या नव्याने विस्तारणाऱ्या क्षेत्रात जागतिक पातळीवर करिअर करण्यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठ देशभरातील तसेच जगातील विद्यार्थ्यांना संधी अवलंबून उपलब्ध करून देत आहे. व्हिनस आर्ट फाउंडेशनचे अपूर्वा पाटील व अमर पाटील विद्यार्थ्यांना उत्कृष्टपणे मार्गदर्शन करत आहेत.

# 'महायुती' त महाभारत, दया, कुछ तो गडबड है!

**महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सत्तेवर आलेल्या सरकारची गाडी पहिल्या दिवसापासूनच पंक्चर झाली की काय,अशी अवस्था आहे. आधी सत्तेवर येताना भांडणे, त्यात प्रचंड बहुमत मिळू नये मंत्रिपद वाटपात भांडणे.. आणि आता पालकमंत्री पदावरून नाराजीचा सूर !**





'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच अजित पवार यांचे सूर काही जुळलेले नाहीत, धुसफूस सुरू आहे. महायुतीत महाभारत सुरू असून त्यात नारदाची भूमिका कोणाची? आणि अखेरीस गारद कोण होणार हे पाहणं आता महत्त्वाचं ठरणार आहे. दया, कुछ तो गडबड है!

फडणवीस परदेशात असताना महायुतीत रंगलेल्या महाभारतात काही जण धारातीर्थी पडण्याची वेळ आली आहे. वाद केवळ पालकमंत्रिपदावरून नाही, तर त्यामागे अन्य कारणेही असावीत. महायुतीत एकूण तीन पक्ष.. त्यातील दोन्ही मित्रपक्षांची मुख्यमंत्री विश्वासात घेत नसल्याची भावना आहे. रायगड व नाशिकच्या पालकमंत्रिपदाच्या नियुक्त्या स्थगित करण्याची नामुष्की आली आहे, हे काही चांगलं लक्षण नाही.

## प्रचंड बहुमत कशासाठी?

महायुतीला प्रचंड बहुमत राज्याचा विकासगाडा कोणतेही गतिरोधक न येता वेगाने पुढे नेण्यासाठी दिले आहे; परंतु, मुख्यमंत्री निवडीपासून मंत्रिमंडळाचा विस्तार, पालकमंत्र्यांची निवड या बाबींना लागलेला कालावधी पाहता सरकारमला बहुमत आहे, परंतु त्यांच्यात समन्वय नाही आणि परस्पर विश्वासाची भावना राहिलेली नाही, हे स्पष्ट दिसते.

मतभेदांमध्ये थोडं डोकावून पाहिले तर केवळ पालकमंत्रिपदावरून नाराजी आहे, असे नाही, तर सत्ता आल्यानंतरच्या गेल्या दोन महिन्यांतील अनुभवाचा राग काढण्याची ही संधी म्हणून तिचा वापर केला गेला. एकनाथ शिंदे यांच्या काळात झालेल्या निर्णयात केलेले बदल आणि अजित पवार गटाच्या मंत्र्यांनी घेतलेल्या निर्णयाला परस्पर स्थगिती देण्याचा मुख्यमंत्र्यांचा निर्णय हे मित्रपक्षांच्या नाराजीचे कारण आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय साह्यता कक्षावरून शिंदे यांच्या निकटवर्तीयाला हटवणे, रुग्णवाहिका खरेदीचा निर्णय रद्द करणे, असे अनेक निर्णय फडणवीसांनी घेतले. शिंदे सरकारच्या निर्णयावरचा हा अविश्वास होता. हीच बाब अजितदादांच्या बाबतीत घडली. त्यांच्या मंत्र्यांनी घेतलेले निर्णय रद्द करण्यात आले. शिंदे व पवार यांना विश्वासात घेऊन हे निर्णय घेतले गेले असते, तर दरी वाढत गेली नसती. मुख्यमंत्र्यांनी स्वतःच बाहेरच्या जिल्ह्याचे पालकमंत्री करण्याचे सूतोवाच केले होते, परंतु पुणे आणि रायगड वगळता राष्ट्रवादी काँग्रेसच्या बाबतीत हे तत्त्व लागू करताना भाजप आणि शिवसेनेच्या मंत्र्यांच्या बाबतीत अपवाद वगळता ते लागू केले नाही. पालकमंत्री पदावरील वाद अगदी शिगेला पोहोचले आहेत. थोडक्यात काय मनमानी करून पालकमंत्रीपदे वाटती गेली, अशी अविश्वासाची भावना आहे.

## कारभार एकदिलाने नाही

मुख्यमंत्री परदेशात असताना पालकमंत्रिपदावरून आपल्याच सरकारविरोधात थेट रस्त्यावर उतरून मंत्री समर्थक आंदोलन करीत असतील आणि त्यावरून सत्ताधाऱ्यांतत कलगीतुरा होत असेल, तर सरकार एकदिलाने कारभार कसा करणार, हा प्रश्न उरतो. एकमेकांच्या मांडीला मांडी लावून बसणारे मंत्री जिल्ह्यांत एकमेकांचा पाणउतारा करणार असतील, तर त्यांच्याकडून विकासाची अपेक्षा बाळगायची, की त्यांच्यातल्या हाणामाऱ्या पाहण्यात समाधान मानायचे, असे जनतेला वाटू शकते. मनाप्रमाणे नाही झाले, की गावाला जाऊन बसायचे, कुठेतरी गायब व्हायचे, असे फंडे आता दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी शोधले आहेत, हे नक्की! एवढ्या दिवसांनंतर पालकमंत्री जाहीर केल्यानंतरही दोन जिल्ह्यांच्या नियुक्त्या स्थगित करण्याची नामुष्की सरकारवर ओढवली. रायगडच्या पालकमंत्रिपदी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या आदिती तटकरे यांचे नाव जाहीर केले गेले; परंतु यावरून गोगावले यांनी उघड नाराजी व्यक्त केली. शिंदे तसेच उद्योगमंत्री उदय सामंत यांनीही पालकमंत्र्यांच्या यादीत गोगावले यांचे नाव नसणे, हे आमच्या सर्वांसाठीच धक्कादायक होते, अशी प्रतिक्रिया दिली होती. गुलाबराव पाटील यांनीही नाराजी व्यक्त केली. रायगडच्या पालकमंत्रिपदावरून जाहीर नाराजी व्यक्त होऊ लागल्यानंतर तटकरे यांनी सावध भूमिका घेतली. 'गोगावले माझे सहकारी मंत्री आहेत. मला जबाबदारी दिली असली तरी गोगावले हेसुद्धा अनेक वर्षांपासून काम करत आहेत. यामुळे आम्ही समतोल राखून जिल्ह्यासाठी काम करू. कार्यकर्त्यांमध्ये स्वाभाविकपणे नाराजी राहत असते. कारण प्रत्येक पक्षाला वाटते, की त्यांना प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळायला हवी. मी माझ्या वतीने महायुतीतील तिन्ही पक्षाचे नेतृत्त्व आणि स्थानिक आमदार यांच्यासमवेत काम करेन, 'असे त्या म्हणाल्या.पालकमंत्रिपदावरून नुकतीच समोर आलेली नाराजी असो किंवा सत्तास्थापनेनंतर मंत्रिमंडळ विस्तार, खातेवाटप यांवरून झालेली रस्सीखेच असो, हे सर्व पाहता महायुतीत सर्वकाही आलबेल नाही. महायुतीला प्रचंड बहुमत मिळूनदेखील या सरकारमध्ये धुसफूस सुरूच आहे.

याशिवाय, आपल्या पक्षातील नेते, मंत्री त्यांच्या अपेक्षा, महत्त्वाकांक्षा, पक्ष संघटन अशी मोठी जबाबदारी युतीतील दोन्ही मित्रपक्षांच्या नेतृत्त्वाच्या खांद्यावर आहे. यामुळे महायुतीत भाजप क्रमांक एकचा पक्ष असला, तरी आपल्या पक्षाला डावलले जाऊ नये किंवा तसे संदेश पक्षातील कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्यात जाऊ नये, याचीही खबरदारी दोन्ही नेत्यांना साहजिकच घ्यावी लागत आहे; परंतु हा समतोल कितपत शक्य आहे, असाही प्रश्न आहे. मंत्रिमंडळात भाजपला अपेक्षेप्रमाणे जास्त खाती मिळाली. त्यांच्या बहुतांश मंत्र्यांना पालकमंत्रिपदे मिळाली. काहींना सहपालकमंत्री करण्याचा नवा पायंडा मुख्यमंत्र्यांनी पाडला. पालकमंत्रिपद अथवा अन्य कारणांवरून झालेली धुसफूस पाहता बहुमत असले, तरी सहमतीने निर्णय घेणे किती गरजेचे आहे हे या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले आहे.

## भरभरून मिळालं, अजीर्ण झालं

महायुतीला मिळालेले आकडे अजीर्ण झाले आहेत, अशी परिस्थिती असल्याने मुख्यमंत्रिपद, खातेवाटप, पालकमंत्रिपद यावर तीन पक्ष एकत्र असताना वारंवार असे प्रश्न उपस्थित होत आहे. पक्षातल्या लोकांना गृहीत धरून कारभार रेटू शकत नाहीत, याची जाणीव वारंवार मित्र पक्षांकडून केली जात आहे. पर्याय नसला तरी वाटेल त्या तडजोडी होणार नाहीत, असाही संदेश मित्रपक्षांकडून दिला जात आहे.

## चित्र तेच.. वातावरण नवे

पूर्वीच्या, आघाडी सरकारमध्ये हे चित्र दिसले होते. यामुळे हे नवीन आहे अशातला भाग नाही. अर्थात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय संघर्ष दिसत असताना राज्याच्या सरकारच्या स्थिरतेवर कोणताही परिणाम होणार नाही. फडणवीस महाराष्ट्रात परतल्यानंतर पालकमंत्रिपदाचा तिढा सोडवताना काय तोडगा काढतात? यात कोणाच्या बाजूने निर्णय होईल किंवा दोन्ही मित्र पक्षांतील नेत्यांचे समाधान करता येईल का? हे येणारा काळच सांगेल.

आदिती तटकरे आणि गिरीश महाजन यांच्या पालकमंत्रिपदाला स्थगिती देण्यात आली असली, तरी त्यांच्याच हस्ते २६ जानेवारीला रायगड आणि नाशिकमध्ये झेंडावंदन होणार असल्याने या दोन्ही जिल्ह्यांचा पेच प्रजासत्ताकदिनानंतर सुटेल, हे स्पष्ट आहे. मुंबईपासून सिंधुदुर्गपर्यंत राष्ट्रवादी काँग्रेसला कुठेही पालकमंत्रिपद न दिल्यामुळे रायगडचे पालकमंत्रिपद दिल्याचे आता बावनकुळे सांगत आहेत, हेच पालकमंत्रिपद जाहीर होण्याअगोदर शिंदे यांना सांगितले असते, तर नंतरचा तमाशा झाला नसता! रायगडमध्ये शिवसेना आणि भाजपच्या आमदारांची संख्या जास्त असल्यामुळे गोगावले यांना पालकमंत्रिपद मिळायला हवे, असा दावा शिंदे गट करतो; परंतु मग याच दाव्याचा आधार घेतला, तर नाशिकमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांची संख्या जास्त असल्यामुळे त्या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद राष्ट्रवादी काँग्रेसकडे जायला हवे. राज्य सरकारमधील मंत्र्यांकडे एखाद्या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद दिले जाते. नावातच 'पालक' शब्द असलेल्या या मंत्रिपदाची जबाबदारीही त्यातून बरीचशी स्पष्ट होते.

महायुतीमध्ये वातावरण कार्यकर्त्यांसाठी नक्कीच निराशाजनक आहे. सध्या अजित पवार आणि एकनाथ शिंदे गप्प आहेत. त्यात आता दावोस दौऱ्यात देवेंद्र फडणवीस यांनी मोठी गुंतवणूक आणल्यामुळे सर्वसामान्यांच्या मनात त्यांच्याविषयीची आपुलकी वाढली आहे. त्यांची ही वाढती लोकप्रियता अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांना सहन होत नाही का हा खरा प्रश्न आहे!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अमित शाहांबरोबर राजकीय चर्चा झाली का?

## छगन भुजबळ यांची प्रतिक्रिया, 'जय जवान, जय किसान एवढीच चर्चा

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बाळासाहेब ठाकरेंच्या जयंती निमित्त आज मुंबईत शिवसेना (ठाकरे) पक्षाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यातून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आगमी महापालिका निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत. याबरोबरच ठाकरेंनी भाजपाचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना इशारा देखील दिला आहे.**



### महात्मा गांधी यांचे स्वप्न पूर्ण होईल

एखादी कमिटी तयार केली तरी वर्षभरात किती भांडण होतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी देखील सगळ्या जातीच्या लोकांना एकत्र करून स्वराज्याची निर्मिती केली. आपल्या शिवाजी रावांनी त्यांचे नाव सार्थकी लावले आहे. सुराज्य काय असते ते इथे येऊन पाहा. असेच काम सर्वत्र झाल्यास ग्राम स्वराज्य हे महात्मा गांधी यांचे स्वप्न पूर्ण होईल. संपूर्ण भारतात याचा प्रचार झाला पाहिजे. त्यांच्या लोकप्रियतेचे पंतप्रधान मोदी यांनी याचे कौतुक केले आहे. आज अमित शहा देखील येत आहेत. त्यांचे इथे येणे आणि तुम्हाला शुभेच्छा देणे हे खूप महत्त्वाचे आहे. अमित शहा इथे येऊन हे सर्व काम पाहातील, माहिती घेतील आणि तुमच्याशी बोलतील. तुमच्या या कामाचं करावं तेवढं कौतुक कमीच आहे असेही भुजबळ यांनी म्हटले आहे.

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळातून डावलल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली होती. एवढंच नाही तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर थेट नाव घेत टीका देखील केली होती. मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्यामुळे छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेटही घेतली होती. त्यामुळे छगन भुजबळ यांच्या मनात नेमकं काय चाललंय? याबाबत वेगवेगळ्या चर्चा रंगल्या होत्या. दरम्यान, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह महाराष्ट्र दौऱ्यावर होते. यावेळी नाशिक जिल्ह्यातील एका कार्यक्रमात अमित शाह आणि छगन भुजबळ हे व्यासपीठावर शेजारी बसलेले पाहायला मिळाले. एवढंच नाही तर व्यासपीठावर अमित शाह आणि छगन भुजबळ यांच्यात काहीवेळ चर्चाही झाली. त्यामुळे नेमकं काय चर्चा झाली? काही राजकीय चर्चा झाली का? असे सवाल उपस्थित करण्यात आले. मात्र, यावर आता खुद्द छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली. 'जय जवान, जय किसान एवढीच चर्चा झाली. दुसरी काही चर्चा झाली नाही', असं म्हणत राजकीय चर्चा झाली नसल्याचं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

### छगन भुजबळ काय म्हणाले?

अमित शाह यांच्याबरोबर काय चर्चा झाली? काही राजकीय चर्चा झाली का? असे सवाल छगन भुजबळ यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारले. यावर बोलताना छगन भुजबळ यांनी म्हटलं की, "चर्चा एवढीच झाली की सर्व चांगलं आहे. तीन वर्षांपूर्वी येथील काही लोक माझ्याकडे आले. तेव्हा मला विश्वास नव्हता की असं होऊ शकतं. पण ही एक खरोखर किमया येथील शेतकऱ्यांनी करून दाखवली असं अमित शाह यांनी म्हटलं", असं छगन भुजबळ यांनी सांगितलं.

### राजकीय चर्चा झाली का?

अमित शाह यांच्याबरोबर काही राजकीय चर्चा झाली का? असं विचारलं असता छगन भुजबळ यांनी म्हटलं की, "जय जवान, जय किसान यावरच चर्चा झाली. दुसरी काही चर्चा झाली नाही. तसेच ते मला म्हणत होते की तुम्ही भाषण का नाही करत? तेव्हा मी त्यांना सांगितलं की तुम्ही येण्याच्या आधीच मी भाषण केलं. तसेच राजकारणावर काहीही चर्चा झाली नाही", असं भुजबळांनी सांगितलं.

### दिल्लीला बोलावलं आहे का?

अमित शाह यांनी तुम्हाला दिल्लीला बोलावलं आहे का? तुम्ही भविष्यात दिल्लीला जाणार आहात का? असे सवाल छगन भुजबळ यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारले. मात्र, यावर थेट उत्तर देणं छगन भुजबळ यांनी टाळलं. ते म्हणाले, "दिल्ली या देशाची राजधानी आहे. तुम्ही आणि आम्ही आपण कधीही जाऊ शकतो", असं म्हणत त्यांनी अधिक प्रतिक्रिया देणं टाळलं.

---

# ममता कुलकर्णीने घेतला संन्यास!

## भगवे वस्त्र, गळ्यात रुद्राक्षाच्या माळा अन्... साध्वी बनत नावात केला बदल

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**नव्वदीच्या दशकातील प्रसिद्ध अभिनेत्री ममता कुलकर्णी २५ वर्षांनंतर भारतात परतल्या आहेत आणि त्यांनी कुंभमेळ्यात संन्यास घेतला आहे. आता ममता नंद गिरी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ममता किन्नर आखाड्याच्या महामंडलेश्वर होणार आहेत. त्यांचे अनेक फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत, ज्यात त्या साध्वीच्या वेशात दिसत आहेत.**



### फोटो आणि व्हिडीओ व्हायरल

विशेष म्हणजे ममता कुलकर्णीने स्वत: इन्स्टाग्रामवर काही व्हिडीओ पोस्ट केले आहेत. या फोटोत ममता कुलकर्णी ही साध्वीच्या रुपात पाहायला मिळत आहे. मी आज कुंभमेळ्यात जाणार आहे. येत्या २९ जानेवारीला मौनी अमावस्येला शाही स्नान करुन मी विश्वनाथ मंदिरात जाईन. यानंतर मी अयोध्येत जाऊन तिथे पिंडदान करेन, अशी माहिती ममता कुलकर्णीने दिली आहे. दरम्यान ममता कुलकर्णीचे साध्वी बनल्यानंतरचे अनेक फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. तिच्या पोस्टवर चाहते कमेंट करताना दिसत आहेत.

नव्वदीच्या दशकातील प्रसिद्ध अभिनेत्री ममता कुलकर्णीने तिच्या सौंदर्याने सर्वांना वेड लावलं होतं. प्रसिद्धीच्या झोतात असताना ती अचानक सिनेसृष्टीतून गायब झाली. यानंतर आता तब्बल २५ वर्षांनी ममता कुलकर्णी ही भारतात परतली आहे. ममता कुलकर्णी ही सध्या प्रयागराज महाकुंभला पोहोचली आहे. सध्या ममता कुलकर्णीचे अनेक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. यात फोटोत ममता कुलकर्णी ही साध्वीच्या वेशात पाहायला मिळत आहे.

ममता कुलकर्णीने घेतला संन्यास

ममता कुलकर्णीने महाकुंभ मेळ्यात संन्यास घेतला आहे. ममता कुलकर्णी आज किन्नर आखाड्याची महामंडलेश्वर बनणार आहे. याआधी तिचे काही फोटो समोर आले आहेत. या फोटोत ममता कुलकर्णीने अंगावर भगव्या रंगाचे वस्त्र परिधान केले आहेत. त्यासोबतच गळ्यात रुद्राक्षाच्या माळा आणि खांद्यावर एक झोळी लटकवलेल्या स्वरुपात दिसत आहे. यामुळे ममता कुलकर्णीने संन्यास घेतल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. तिने सिनेसृष्टीचा मार्ग सोडून धार्मिक मार्ग स्वीकारल्याचे पाहायला मिळत आहे.

### नावात बदल

ममता कुलकर्णी ही साधवीच्या वेषात किन्नर आखाड्यात दिसली होती. किन्नर आखाड्यात महामंडलेश्वर बांधले जात असून, त्यात पट्टाभिषेक केल्यानंतर ममता कुलकर्णीला महामंडलेश्वर ही पदवी देण्यात येणार आहे. त्यापूर्वी ममताने आखाड्याचे आचार्य महामंडलेश्वर डॉ. लक्ष्मी नारायण त्रिपाठी यांची भेट घेत त्यांचे आशीर्वाद घेतले. याचे फोटोही व्हायरल झाले. विशेष म्हणजे ममता कुलकर्णीने तिच्या नावातही बदल केला असून ती आता 'श्री यामाई ममता नंद गिरि' या नावाने ओळखली जाणार आहे.

# श्रेयस अय्यर आणि अंपायरमध्ये जुंपली!

## वाद सोडविण्यासाठी अजिंक्य रहाणेला करावा लागला हस्तक्षेप



। मुंबई।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मुंबई आणि जम्मू-काश्मीर यांच्यात सुरू असलेल्या रणजी ट्रॉफी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी जोरदार नाट्य पाहायला मिळाले. सामन्यादरम्यान श्रेयस अय्यरच्या झेलवरून वाद झाला. श्रेयस अय्यर १७ धावा केल्यानंतर गोलंदाज आकिब नबीच्या षटकात झेलबाद झाला. यानंतर गोलंदाजाने जोरदार अपील केले आणि अंपायरने आऊट घोषित केले. यानंतर श्रेयस अय्यरने पॅव्हेलियनमध्ये परतण्याऐवजी त्याने मैदानावरच अंपायरशी वाद घालण्यास सुरुवात केली. यानंतर नॉन स्ट्राईकवर असलेला कर्णधार अजिंक्य रहाणेनेही नाराजी व्यक्त केली. पण निर्णय बदलला नाही आणि अय्यर परतावे लागले.**

### श्रेयस अय्यर आणि अंपायरमध्ये जुंपली

जम्मू-काश्मीरचा वेगवान गोलंदाज आकिब नबीचा चेंडू श्रेयस अय्यरच्या बॅटची धार घेऊन विकेटकीपर कन्हैया वाधवनकडे गेला. त्याने डुबकी मारून तो पकडला. पण हा झेल योग्य पद्धतीने घेतला गेला नाही, असे अय्यरचे मत होते. त्यामुळे पंचांनी आऊट दिल्यानंतरही तो नाराजी व्यक्त करत होता. त्यानंतर रहाणेला या प्रकरणात हस्तक्षेप करावा लागला. त्याने आपली नाराजी देखील व्यक्त केली आणि मैदानावरील अंपायर एस रवी यांच्याशी या झेलबद्दल चर्चा केली. मात्र प्रदीर्घ चर्चा होऊनही अंपायर त्यांचे म्हणणे मान्य करण्यास तयार नव्हते. ज्यामुळे त्यांनी आपला निर्णय कायम ठेवला. यानंतर अय्यर रागाने ड्रेसिंग रूमकडे गेला.

### यापूर्वीही झाला होता वाद

याआधीही जम्मू-काश्मीर आणि मुंबई यांच्यात खेळल्या जाणाऱ्या सामन्यात कॅटवरुन नाट्य रंगले होते. त्यावेळीही फलंदाज अय्यर आणि अंपायर एस रवी होते. खरे तर दुसऱ्या डावात अय्यर ८ धावा करून फलंदाजी करत असताना यष्टीरक्षकाने झेलबादची अपील केले होते. गोलंदाजांसह जम्मू-काश्मीरच्या खेळाडूंना चेंडूला बॅटचा स्पर्श झाल्याचा आत्मविश्वास होता. मात्र जोरदार अपील करूनही पंचांनी आऊट दिले नाही. यानंतर खेळाडू चांगलेच संतापलेले दिसले होते.

### शार्दुल ठाकूरची शानदार शतक खेळी

शार्दुल ठाकूरने मुंबईसाठी शानदार कामगिरी केली आहे. त्याने शतक ठोकून संघाची प्रतिष्ठा वाचवली आहे. या सामन्यात रोहित आणि रहाणेसारखे दिग्गज खेळाडू काही खास करू शकले नाहीत. शार्दुल ठाकूरने मुंबईसाठी शानदार कामगिरी केली आहे. त्याने रणजी ट्रॉफी २०२४-२५ मध्ये जम्मू आणि काश्मीर विरुद्धच्या सामन्यात शतक झळकावले. शार्दुलने मुंबईची प्रतिष्ठा वाचवली आहे. रोहित शर्मा आणि श्रेयस अय्यर यांच्यासह अनेक महान खेळाडू असलेला मुंबईचा संघ पहिल्या डावात १२० धावा करून सर्वबाद झाला. दुसऱ्या डावातही ती डगमगली. पण नंतर शार्दुलने जबाबदारी घेतली. त्याने पहिल्या डावात अर्धशतकही झळकावले होते. दुसऱ्या डावात मुंबईने ९१ धावांवर ६ विकेट गमावल्या होत्या. संघाने १०१ धावांवर ७वी विकेट गमावली. यानंतर शार्दुल आणि तनुश कोटियन यांनी प्रकरण नियंत्रणात आणले.

### शार्दुल ठाकूरच्या शतकाने मुंबईला तारलं –

मुंबईने दुसऱ्या डावात ९१ धावांवर ६ विकेट्स गमावल्या होत्या. यानंतर १०१ धावांवर संघाने सातवी विकेट्स गमावली. यानंतर शार्दुल आणि तनुष कोटियन यांनी संघाचा डाव सावरला. शार्दुलने शतक झळकावले. वृत्त लिहेपर्यंत त्याने ११९ चेंडूत ११३ धावा केल्या होत्या. शार्दुलच्या खेळीत १७ चौकारांचाही समावेश होता. शार्दुलच्या शतकाबरोबरच तनुष कोटियननेही शानदार कामगिरी केली. त्याने अर्धशतक झळकावले आहे. तनुषने ११९ चेंडूंचा सामना करत ५८ धावा केल्या होत्या. त्याच्या खेळीत ६ चौकारांचा समावेश होता. शार्दुल आणि तनुषच्या खेळीच्या जोरावर मुंबईने ६७ षटकानंतर ७ गडी गमावून २७४ धावा करत १८८ धावांची आघाडी घेतली होती.

### मुंबईच्या टॉप ऑर्डरमधील फलंदाजांचा फ्लॉप शो कायम –

सामन्याच्या दुसऱ्या डावातही मुंबई संघातील स्टार फलंदाजांचा फ्लॉप शो होता. दुसऱ्या डावात भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्मा केवळ २८ धावा करून बाद झाला. यशस्वी जैस्वालने २६, अजिंक्य रहाणेने १६ आणि शिवम दुबे ० धावांवर पॅव्हेलियनमध्ये परतले. पहिल्या डावात रोहितने ३ धावा, यशस्वीने ४ धावा, रहाणेने १२ धावा, अय्यरने ११ धावा केल्या तर शिवम दुबे खाते न उघडता बाद झाला.

# इंटर इंजिनिअरींग बास्केटबॉल स्पर्धा

## पिंपरी-चिंचवड पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांची चमकदार कामगिरी




। पिंपरी- चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंटर इंजिनियरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन"डी.१"झोन तर्फे मुला व मुलींची बास्केटबॉल स्पर्धा नुकतीच पार पडली या स्पर्धेमध्ये पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली.**

पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकमध्ये प्रथमच बास्केटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या, स्पर्धेचे उद्घाटन पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे सचिव विठ्ठल सोमाजी काळभोर, नरेंद्र ज्ञानेश्वर लांडगे व कॉलेजच्या प्राचार्या डॉ.विद्या बॅकोड यांच्या उपस्थितीत पार पडले. क्रीडा समन्वयक सुनिल जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी धरकुडे यांनी आलेल्या सर्व टीम संघ व्यवस्थापकांचे तसेच खेळाडूंचे स्वागत केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनोज वाखारे सर तसेच आभार प्रदर्शन श्री शाहूराज कदरे यांनी केले. या कार्यक्रमासाठी फिजिकल डायरेक्टर संतोष पाचारणे यांचे मार्गदर्शन लाभले.

### वाडिया पॉलिटेक्निक प्रथम क्रमांकाचा मानकरी...

बास्केटबॉल स्पर्धेत वाडिया पॉलिटेक्निक, पुणे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. मुलांच्या स्पर्धेमध्ये पिंपरी-चिंचवड पॉलिटेक्निकने द्वितीय क्रमांक, तर मुलींच्या स्पर्धेमध्ये अजिंक्य डी वाय पाटील लोहगाव यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

# तृतीय पुण्यस्मरण



## कै. सौ. रेखा राजेंद्रसिंह यादव

उपाध्यक्ष सिद्धांत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन

जन्म दिनांक : १६/०५/१९५८ । मृत्यु दिनांक : २५/०१/२०२२

तुमच असण आमच्यासाठी सर्वकाही होतं
ते आमच्या आयुष्यातील एक सुंदर पर्व होते
आज सर्व काही असण्याची जाणीव आहे
पण तुम्ही नसणे ही मोठी उणीव आहे.

संपूर्ण यादव परिवार व आप्तेष्ट
सिद्धांत ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन

# पिंपरी चिंचवड विद्यापीठात जीवनदायिनी रक्तदान शिबिराचे आयोजन

## कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी यांच्या हस्ते उद्घाटन

**। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगांव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ मधील येथे जीवनदायिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी यांच्या हस्ते करण्यात आले.

यासाठी विद्यापीठाच्या फार्मा व्हिजनरी क्लब आणि स्कूल ऑफ मॅनेजमेंट व रेड प्लस ब्लड बँकेचे सहकार्य लाभले. विद्यार्थी आकाश कुंभार आणि श्रेया वरुटे यांच्यासह १९२ दात्यांनी रक्तदान केले. आयोजनात स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे प्रमुख डॉ. अमित पाटील आणि सह. प्रा. प्रुथा सांबरे यांनी केले. सहभागी रक्तदात्यांना रेड प्लस ब्लड बँकेच्या वतीने कार्ड देण्यात आले. पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती हर्षवर्धन पाटील, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे आणि पीसीईटी अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी रक्तदात्यांचे अभिनंदन केले.



